नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १६९ Issue - 169 | वार शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०२५ Blow- Saturday Date 8 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## अखेर जमिनीचा व्यवहार रद्द

### अजित पवारांनी दिली माहिती; कुणाचे फोन आले, कुणी मदत केली सर्व चौकशी होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पुण्यातील कोंढवा जमीन अनियमितता प्रकरणी पार्थ पवार यांच्यावर गंभीर आरोप झाल्यानंतर आता हा व्यवहार रद्द करण्यात येणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यातच, उपमुख्यमंत्री तथा पार्थ पवार यांचे वडील अजित पवारांनी व्यवहारासंदर्भात माहिती दिली. माझ्या माहितीनुसार हा व्यवहार रद्द करण्यात आला आहे. आता, याप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली असून ही समिती संपूर्ण चौकशी करेल, त्या चौकशीत सर्व घटनाक्रम पुढे येईल. कोणी मदत केली, कुणाचे फोन गेले हे सगळं समोर येईल. मात्र, मी नेहमीच माझ्या स्वकीयांना, नातेवाईकांनाही सांगतो, नियमाच्या बाहेर जाऊन केलेलं मला चालणार नाही, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.



मी आजपर्यंतच्या राजकीय जीवनात नियम तोडून काम केलेलं नाही. मागे माझ्यावर २००९-१० ला आरोप झाले पण ते सिद्ध झाले नाहीत. त्याच्यात अनियमितता होती, श्वेतपत्रिका काढली हे आपल्याला ज्ञात आहे. अधून मधून कमेंटस करुन टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातो. या व्यवहारात मला अजिबात काही माहिती नव्हतं. मला माहिती असतं तर लगेच सांगितलं असतं मला विचारुन व्यवहार झालेला आहे. साहजिकच विरोधक आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न करणार, त्यामध्ये दुमत नाही. मात्र, मला आजच माहिती मिळाली की, याप्रकरणी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. पुढील १ महिन्याच्या आत ही समिती आपला अहवाल सादर करणार आहे.

या व्यवहारात माहिती घेतली, चर्चा मोठ्या प्रमाणावर सुरु झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूरला होते. मी त्यांच्याशी फोन-वर संपर्क साधला. जरी माझ्या घरातल्या जवळच्यांचा विषय असला तरी तुम्ही राज्याचे प्रमुख आहात. जे काही नियमाप्रमाणं करावं लागेल, चौकशी करावी लागेल, समिती नेमायची असेल ते करा माझा त्या गोष्टीला पाठिंबा राहील. आरोपातील वस्तूस्थिती जनतेला कळणं आवश्यक असते. या व्यवहारात रुपया देखील दिला गेला नाही. मोठे आकडे सांगितले गेले, गोष्टी सांगितल्या गेल्या. परंतु, मला आज जे कळालं जो काही व्यवहार झाला होता तो रद्द करण्यात आला आहे, अशी माहिती अजित पवार यांनी दिली.

मी राज्याचा उपमुख्यमंत्री असल्यामुळे माझ्या कुठल्याही अधिकाऱ्यांना, सर्व अधिकाऱ्यांना मला सूचना करायची आहे. इथून पुढे जर कुठला प्रकरण आलं आणि ते आम्हाला धरुन नसेल तर कुठल्याही प्रेशर खाली न येता त्यावर काठ मारायची, कोणीही माझा जवळचा नातेवाईक असला तरीही करायचं. मीडियाने या सर्व गोष्टी चालवल्या आहेत, याबद्दल चुकीच्या गोष्टी झाल्या असतील त्याची चौकशी संबंधित अधिकाऱ्यांनी करावी. कुठेही नियामाला बगल देऊन आपण कोणतीही गोष्ट केलेली नाही, तो माझा स्वभाव नाही. हे मी राज्याच्या जनतेला सांगतो.

यामध्ये एकही पैशाचा व्यवहार झालेला नाही, बाकी रजिस्ट्रेशन कसं झालं, कोणी केलं हा तपासाचा भाग आहे. दोन पोलीस स्टेशन मध्ये एफआयआर दाखल झाली आहे. पोलीस पोलिसांचे काम करतील, त्यामध्ये कोणालाही राजकीय हस्तक्षेप करण्याचे काम नाही, दूध का दूध पाणी का पाणी झालं पाहिजे, असेही अजित पवार यांनी म्हटलं.

ही सरकारी जमीन आहे, त्याचा व्यवहारच होऊ शकत नाही, ही पूर्वीचे महार वतनाची जमीन आहे. रेवेन्यू आणि त्यांची टीम ही चौकशी करणार आहे. मग त्याचं झालं कसं? कोणी केलं कोण जबाबदार आहे याचा तपास होईल. तीन लोकांची एफआयआरमध्ये नावं टाकले आहेत. रेवेन्यू मिनिस्टर चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं की, जे ऑफिसमध्ये आले होते, ज्यांनी सह्या घेतल्या त्यांच्यावर एफआयआर दाखल करुन घेतली आहे, म्हणून पार्थ पवार याचे नाव नाही. याशिवाय या जमिनीचा २००५ किंवा ०६ मध्ये याचा व्यवहार काही लोकांनी केला होता, पार्थ आणि त्याचा सहकारी दिग्विजय पाटील यांना कोणतीही माहिती नव्हती, असं त्यांच्या बोलण्यात आलं आहे. महिनाभरात हे सगळं पुढे येईल आणि वस्तुस्थिती आपल्या सगळ्यांना कळेल.

## सार्वजनिक ठिकाणांवरील भटक्या कुत्र्यांना हटवा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: सुप्रीम कोर्टाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. देशभरातील शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, क्रीडा संकुले, बस स्थानके, डेपो आणि रेल्वे स्थानक या सर्व परिसरातून भटक्या कुत्र्यांना 'तत्काळ' हटवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच रस्त्यावरील गायी-म्हशींच्या वावरावरही बंदी घालण्यात आली आहे. पुढील आठ आठवड्यांत हे काम पूर्ण करण्याचे न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले असून, एका वरिष्ठ अधिकाऱ्याला तीन महिन्यांत रस्त्यावरील सर्व कुत्रे हटवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

**शाळा, मैदान परिसरात भटके कुत्रे दिसता कामा नये : सर्वोच्च न्यायालयाचा आदेश**

शुक्रवारी न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. कोर्टाने शैक्षणिक संस्था, सार्वजनिक वाहतूक केंद्रे आणि आरोग्यसेवेशी संबंधित संवेदनशील ठिकाणे भटक्या कुत्र्यांपासून तात्काळ मुक्त करण्यावर जोर दिला आहे.

खंडपीठाने स्पष्ट केले की ज्या ठिकाणांवरून हे कुत्रे उचलले जातील, त्या ठिकाणी त्यांना परत सोडले जाणार नाही. कोर्टाने राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना दोन आठवड्यांच्या आत त्यांच्या प्रादेशिक मर्यादेत असलेल्या सर्व शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, वैद्यकीय महाविद्यालये, सार्वजनिक क्रीडा संकुले, बस स्थानके, डेपो आणि रेल्वे स्थानके ओळखण्यास सांगितले आहे. या सर्व ठिकाणी भटक्या कुत्र्यांची संख्या आणि स्थितीची नोंद घेऊन तात्काळ कारवाई सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

## वंदे मातरम हे प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देणारे गीत : पालकमंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : वंदे मातरम हे गीत भारतातील प्रत्येक नागरिकाला प्रेरणा देणारे गीत आहे. देश प्रेमाची धगधगती ऊर्जा १५० वर्षांनंतरही या गीतातून आजही मिळते. १८७५ साली बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेले वंदे मातरम हे गीत स्वातंत्र्ययुद्धाचे राष्ट्रगान बनले व प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग चेतविले, असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर भारताचा १५० बाय १०० फुटांचा मानवी नकाशा साकारण्यात आला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी श्रीमती रोहिणी तडवळकर, छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयाच्या डॉ. अग्रजा चिटणीस वरेरकर, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य ॲड. सुनंदा भगत, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा चारी- वालेकर, दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक प्रा. डॉ. व्ही. पी. उबाळे, डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य बी. एच. दामजी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमातून वंदे मातरम या गीताच्या वैभवशाली वारशाची आठवण देशाला करून दिली. २०४७ साली भारतीयांच्या स्वप्नातील विकसित भारताच्या जडणघडणीत वंदे मातरम हे गीत महत्त्वाचे ठरणार आहे, असेही त्यांनी सांगितले. वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आई प्रतिष्ठान आणि दयानंद शिक्षण संस्थेतर्फे शुक्रवारी दोन हजार विद्यार्थिनींनी सामूहिक वंदे मातरम गायन केले. यावेळी दोन हजार विद्यार्थिनींनी दीड एकर जागेत भारताचा मानवी नकाशा साकारला. या उपक्रमात दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, डी. जी. बी. दयानंद विधी महाविद्यालय, डी. पी.बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, दयानंद काशिनाथ असावा प्रशाला, भू. म. पुल्ली कन्या प्रशाला, मार्कंडेय हायस्कूल, सिद्धेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील दोन हजार विद्यार्थिनी उत्साहात सहभागी झाल्या होत्या.

## कृषी समृद्धी योजनेसाठी ५६६८ कोटी मंजूर : दत्तात्रय भरणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा निर्मितीसाठी गुंतवणूक करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. जून ते सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालं आहे. यातून शेतकऱ्यांना पुन्हा उभारी मिळावी यासाठी सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. कृषी समृद्धी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ड्रोन, शेततळे, सुविधा केंद्र आणि ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा (इइत्र) यंत्रांसाठी सरकारकडून अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने पुढील ३ वर्षासाठी ५ हजार ६६८ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली आहे. अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. शेतक-यांचे जीवनमान उंचावण्याच्या अनुषंगाने आणि बदलत्या हवामानामुळे अतिवृष्टीसारख्या निर्माण होणा-या संकटास सामोरे जाण्यासाठी कृषी विभागाने राबविलेली कृषी समृद्ध योजना शेतक-यांसाठी निश्चितच फायदेशीर ठरेल असं त्यांनी म्हटले आहे.

राज्य शासनाच्या कृषि विभागाच्या प्रचलित योजनांमध्ये समाविष्ट असलेल्या ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा (इइत्र) यंत्र, वैयक्तिक शेततळे, शेतकरी सुविधा केंद्र उभारणी आणि मुख्यमंत्री शेतकरी ड्रोन हे घटक अधिक विस्तृत स्वरुपात राबवून राज्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने कृषी विभागाने आजच्या शासन निर्णयान्वये उक्त घटकांची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिलीआहे. जास्तीत जास्त शेतक-यांना फायदा मिळण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या संकल्पनेतून या योजनेला विस्तृत स्वरुपं मिळालं आहे.

**शेतकऱ्यांना ड्रोन, शेततळे, सुविधा केंद्र, बीबीएफ यंत्रासाठी अनुदान मिळणार**

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कृषी समृद्ध योजना पुर्णत्वास नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष सहकार्य लाभले. कृषी समृद्धी योजनेतून ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा यंत्र, वैयक्तिक शेततळे, शेतकरी सुविधा केंद्र उभारणी, मुख्यमंत्री शेतकरी ड्रोन या चार घटकांचा समावेश आहे. यामध्ये २५ हजार रुंद सरी वरंबा यंत्रासाठी १७५ कोटी, १४ हजार वैयक्तिक शेतळ्यासाठी ९३ कोटी, शेतकरी सुविधा केंद्र उभारणीसाठी ५ हजार कोटी आणि ५ हजार ड्रोनसाठी ४०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच, कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत विविध शेती उपयोगी यंत्र पुरवणे, जैविक निविष्ठ निर्मिती केंद्र उभारणे, प्लास्टिक अस्तरीकरण, शेततळे, एकात्मिक कीड नियंत्रण, अन्नद्रव्य घटक व्यवस्थापन, मृद परीक्षण प्रयोगशाळा उभारणी, शेतीसाठी ड्रोन या आदी बाबींचा समावेश आहे.

ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा आणि शेततळयासंदर्भात बोलताना भरणे म्हणाले, राज्यभरात २५००० बीबीएफ यंत्रांचा पुरवठा करण्यात येणार आहे. त्यासाठी एक यंत्र दर हंगामात सुमारे १०० हेक्टर क्षेत्रावर काम करू शकते. परिणामी २५ लाख हेक्टर क्षेत्रावर ही पद्धत लागू करता येईल. तसेच बियाण्याचा वापर ३०-४० टक्के कमी आणि उत्पादनात १५-२० टक्के वाढ अपेक्षित असून यंत्राच्या किमतीच्या ५० टक्के किंवा कमाल ७० हजार रुपये देण्यात येणार आहे. तसेच, राज्यात १४००० शेततळ्यांच्या बांधकामासाठी मान्यता दिली गेली आहे. त्याचसोबत, काळी चिकणमाती असलेली जमीन प्राधान्याने निवडली जाईल. वाहत्या पाण्यात किंवा दलदलीच्या भागात कुंड्या घेता येणार नाहीत. यामध्ये शेडच्या आकारानुसार १६ हजार ८६९ ते १ लाख ६७ हजार रुपयांपर्यंतचे अनुदान दिले जाणार आहे. दत्तात्रय भरणे पुढे म्हणाले, सरकारने २ हजार ७७८ शेतकरी सुविधा केंद्रे उभारण्यास मान्यता दिली आहे. प्रत्येक केंद्रासाठी सरासरी प्रकल्प खर्च ३ कोटी रुपये असून कमाल सरकारी अनुदान मर्यादा १ कोटी ८० लाख रुपये ठेवण्यात आले आहे. यामध्ये मृद परीक्षण प्रयोगशाळा, जैविक खत उत्पादन केंद्र, भाडेतत्त्वावर अवजारे व ड्रोन उपलब्धता केंद्र, गोडाऊन व शीतसाखळी सुविधा, कीडनियंत्रण सामग्री व अन्नद्रव्य घटक याचा समावेश आहे. या नव्याने उभारण्यात येत असलेल्या शेतकरी सुविधा केंद्रांमुळे राज्यातील शेतकऱ्यांना सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. तसेच, केंद्र शासनाच्या नमो ड्रोन दिदी योजनेच्या धर्तीवर मुख्यमंत्री शेतकरी ड्रोन याअंतर्गत राज्यात ५ हजार कृषी ड्रोन अनुदानावर दिले जातील. यामध्ये, ड्रोन किमतीच्या ५० टक्के किंवा ८ लाख रुपये अनुदान कृषी पदवीधरांना दिले जाईल. इतर लाभार्थ्यांना ४० टक्के किंवा ४ लाख रुपये अनुदान दिले जाईल आणि ड्रोन खरेदीसाठी, महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा लागेल. २०२५-२०२६ ते २०२७-२८ या तीन वर्षासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून अर्जदार राज्यातील सातबारा धारक असणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्याकडे ॲग्रीस्टॅक फार्मर नोंदणी क्रमांक आवश्यक आहे. लाभार्थी शेतकऱ्याने कृषी विभागाच्या महाडीबीटीवर ऑनलाईन अर्ज केल्यावर प्रथम येणाऱ्यास प्रथम लाभ या तत्वावर लाभार्थी निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांना डीबीटीतून थेट बँक खात्यावर अनुदान जमा करण्यात येणार आहे. यामध्ये शेतकरी, शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्या महाडीबीटीवर अर्ज करून लाभ घेऊ शकतात

## सरकारची जमीन चोरी, मोदीजी तुमचं शांत राहणं खूप काही सांगतं, पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणी राहुल गांधींचा हल्लाबोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : पुण्यातील कोरेगाव पार्कमधील मुंढवा येथील ४० एकर जमीन पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीनं खरेदी केल्याचं प्रकरण समोर आलं आहे. बाजारभावाप्रमाणं १८०० कोटी रुपयांची जमीन केवळ ३०० कोटी रुपयांना विकण्यात आली. या शिवाय राज्याच्या आयटी धोरणाचा लाभ घेत स्टॅम्प ड्युटी देखील कमी आकारण्यात आली. स्टॅम्प ड्युटी ५०० रुपये आकारण्यात आली. पार्थ पवार यांच्या जमीन खरेदीच्या प्रकरणावरुन मोठं वादळ उठलं आहे. याच मुद्यावरुन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतचोरी करुन बनलेल्या सरकारनं केलेली जमीन चोरी असल्याचं म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं शांत राहणं खूप काही सांगतं, असं राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना या प्रकरणी प्रश्न विचारले आहेत. महाराष्ट्रात १८०० कोटी रुपयांची सरकारी जमीन, जी दलितांसाठी आरक्षित होती, फक्त ३०० कोटी रुपयांमध्ये मंत्र्यांच्या मुलाच्या कंपनीला विकण्यात आली. त्यावरील स्टॅम्प ड्युटी देखील हटवण्यात आली. म्हणजेच एक लूट आणि त्यावर कायदेशीर शिक्कामोर्तब करत सूट देण्यात आली. जे मतचोरी करुन बनलेलं सरकार आहे, त्यांच्याकडून करण्यात आलेली ही जमीन चोरी आहे. त्यांना माहिती आहे, कितीही लूट केली तरी मतचोरी करुन पुन्हा सत्तेत येऊ शकतात. राहुल गांधी यांनी दोन दिवसांपूर्वी हरियाणातील मतचोरीचा मुद्दा मांडला होता. पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणात देखील राहुल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा आणला आहे.

अमेडिया कंपनीकडून खाजगी एलएलपी आयटी कंपनी उभारली जाणार होती. यासाठी जी खरेदी विक्री केली जाणार होती, त्याच्या सहीचे अधिकार पार्थ पवारांनी दिग्विजय पाटलांना देण्याचा २२ एप्रिल २०२५ला प्रस्ताव ठेवण्यात आला. या प्रस्तावाची प्रत आता समोर आलीये. या प्रस्तावानंतर २० मे २०२५ ला वादग्रस्त जमिनीचा दस्त झाला. हा दस्त दिग्विजय पाटलांच्या सहीने झाला असून पार्थ पवारांनी सहीचे दिलेल्या अधिकाराची प्रत ही सोबत जोडण्यात आलेली आहे. पार्थ पवार यांच्या अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी कंपनीनं जमीन खरेदीचा व्यवहार केल्या प्रकरणी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच



मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य

१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी

नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### शेतकऱ्यांना दिलासा

कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा निर्मितीसाठी गुंतवणूक करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. जून ते सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालं आहे. यातून शेतकऱ्यांना पुन्हा उभारी मिळावी यासाठी सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. कृषी समृद्धी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ड्रोन, शेततळे, सुविधा केंद्र आणि ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा यंत्रांसाठी सरकारकडून अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने पुढील ३ वर्षासाठी ५ हजार ६६८ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली आहे. अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. शेतक-यांचे जीवनमान उंचावण्याच्या अनुषंगाने आणि बदलत्या हवामानामुळे अतिवृष्टीसारख्या निर्माण होणा-या संकटास सामोरे जाण्यासाठी कृषी विभागाने राबविलेली कृषी समृद्ध योजना शेतक-यांसाठी निश्चितच फायदेशीर ठरेल. राज्य शासनाच्या कृषि विभागाच्या प्रचलित योजनांमध्ये समाविष्ट असलेल्या ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा यंत्र, वैयक्तिक शेत-तळे, शेतकरी सुविधा केंद्र उभारणी आणि मुख्यमंत्री शेतकरी ड्रोन हे घटक अधिक विस्तृत स्वरुपात राबवून राज्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यत पोहोचविण्याच्या दृष्टीने कृषी विभागाने आजच्या शासन निर्णयान्वये उक्त घटकांची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिलीआहे. जास्तीत जास्त शेतक-यांना फायदा मिळण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या संकल्पनेतून या योजनेला विस्तृत स्वरुपं मिळालं आहे. कृषी समृद्ध योजना पुर्णत्वास नेण्यासाठी मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्र्यांचे विशेष सहकार्य लाभले. कृषी समृद्धी योजनेतून ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा यंत्र, वैयक्तिक शेततळे, शेतकरी सुविधा केंद्र उभारणी, मुख्यमंत्री शेतकरी ड्रोन या चार घटकांचा समावेश आहे. यामध्ये २५ हजार रुंद सरी वरंबा यंत्रासाठी १७५ कोटी, १४ हजार वैयक्तिक शेतळ्यासाठी ९३ कोटी, शेतकरी सुविधा केंद्र उभारणीसाठी ५ हजार कोटी आणि ५ हजार ड्रोनसाठी ४०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच, कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत विविध शेती उपयोगी यंत्र पुरवणे, जैविक निविष्ठ निर्मिती केंद्र उभारणे, प्लास्टिक अस्तरीकरण, शेततळे, एकात्मिक कीड नियंत्रण, अन्नद्रव्य घटक व्यवस्थापन, मृद परीक्षण प्रयोगशाळा उभारणी, शेतीसाठी ड्रोन या आदी बाबींचा समावेश आहे. ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा आणि शेततळ्यांसंदर्भात बोलताना भरणे म्हणाले, राज्यभरात २५००० बीबीएफ यंत्रांचा पुरवठा करण्यात येणार आहे. त्यासाठी एक यंत्र दर हंगामात सुमारे १०० हेक्टर क्षेत्रावर काम करू शकते. परिणामी २५ लाख हेक्टर क्षेत्रावर ही पद्धत लागू करता येईल.

# जाज्वल्य इतिहासाच्या प्रेरणेतूनच समृद्ध भारताची निर्मिती शक्य : निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील

## होम मैदानावर मोठ्या उत्साहात सामूहिक वंदे मातरम् गायन उपक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, : स्वातंत्र्योत्तर आणि स्वातंत्र्यपूर्व काळातील घटनांचा आढावा घेता त्यामधील प्रेरणास्थाने शोधून त्यातून बोध घेतल्यामुळेच आपल्याला समृद्ध भारताची उभारणी करणे आणि नव्या दमाने विकास घडविणे शक्य झाले आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले. ते शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग तथा सांस्कृतिक कार्य मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वंदे मातरम गीताच्या सार्थ शताब्दी महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.






येथील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व राणी कित्तूर चेन्नम्मा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) या दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने सदरच्या कार्यक्रमाचे सोलापूर येथे आयोजन करण्यात आलेले होते.

यावेळी प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, छउउ चे कमांडिंग ऑफिसर रणधिर सतिश, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार, कोषागार अधिकारी वैभव राऊत, एस,आर,पी,एफ सहाय्यक समादेश श्री.आऊंदेकर, सहायक पोलिस आयुक्त मच्छिंद्र पंडीत, तरूण भारतचे माजी संपादक अरविंद जोशी, प्रसाद जिरांकलगीकर,आय,टी,आय चे प्राचार्य मनोज बिडकर आदी कर्मचारी अधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जिल्ह्याच्या ४५ शाळा महाविद्यालयातील १० हजार विद्यार्थ्यांचा वंदे मातरम गायन उपक्रमात सहभाग**

वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याचे निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी ३५८ तालुक्यातून या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. सोलापूर येथील कार्यक्रम होम मैदान येथे आयोजित करण्यात आलेला होता. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील हे होते. श्री प्रसाद जिरांकलगीकर यांनी पाच कडव्यांचे संपूर्ण वंदे मातरम गीत सादर केले व त्यांच्या सुरात सूर मिसळून उपस्थित सुमारे साडेसहा हजार जणांनी हे गीत गाऊन वातावरण राष्ट्रभक्तीमय केले.

प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी मनोज बिडकर यांनी प्रस्ताविक केले यांप्रसंगी सोलापूर शहर व परिसरातील विविध ४५ शाळा महाविद्यालय येथील प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी , विद्यार्थिनी यासोबतच शासकीय तथा निमशासकीय कार्यालय येथील कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील विविध शाळा तथा महाविद्यालयातील एनसीसी युनिट्स व एनएसएस युनिट्स चा या कार्यक्रमामध्ये सक्रिय सहभाग होता.

जुळे सोलापूर परिसरातील वि.मो. मेहता प्रशालेतील विद्यार्थ्यांनी वंदे मातरम या विषयावर आकर्षक पथनाट्याचे सादरीकरण केले. याप्रसंगी विविध शाळा आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षणार्थींनी विविध राज्यांच्या पारंपारिक वेशभूषे सह उपस्थिती नोंदवून या सोहळ्यात रंगत आणली.

सोलापूर शहरातील हरीभाई देवकरण प्रशाला सिद्धेश्वर प्रशाला रॉजर्स इंग्लिश मीडियम स्कूल लिटिल फ्लॉवर कॉन्व्हेंट स्कूल ज्ञान प्रबोधिनी प्रशाला सेवासदन प्रशाला वि मो मेहता प्रशाला हिराचंद नेमचंद प्रशाला विविध खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था यामधून शेकडो विद्यार्थी तसेच एस आर पी कॅम्प सोलापूर पोलीस ग्रामीण पोलीस पोलीस अधीक्षक कार्यालय यासारख्या विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी तथा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाने सोलापूर येथे दि. ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी साडेनऊ ते साडेदहा या वेळेत सामूहिक वंदे मातरम गायन उपक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात सोलापूरच्या जवळपास ४५ माध्यमिक शाळा व महाविद्यालये यांचे विद्यार्थी व शिक्षक, स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचारी, जिल्हा परिषद, महानगरपालिका, पोलीस आयुक्तालय, ग्रामीण पोलीस, जिल्हा कोषागार येथील प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन आयटीआयचे केंदळे प्रवीण व श्रीमती कुंभार यांनी केले. प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य मनोज बिडकर यांनी केले, तर सूर्यकांत झणझणे यांनी आभार मानले.

## विद्यार्थी दिवस उत्साहात साजरा - समाज कल्याण विभागात विविध उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : आजचा विद्यार्थी हा देशाच्या भविष्यातील पाया असून आदर्श विद्यार्थी घडविणे ही काळाची गरज असल्याने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. २७ ऑक्टोबर २०२५ च्या शासन परिपत्रकानुसार विद्यार्थी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे कार्यालयामार्फत दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सामाजिक न्याय भवन, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशनसमोर, येरवडा येथे विद्यार्थी दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विशाल लोंढे, सहायक आयुक्त, समाज कल्याण होते. कार्यक्रमात शिक्षण हे वाघिणीचे दूध या विषयावर ॲड. बिभीषण गदादे यांचे प्रेरणादायी व्याख्यान घेण्यात आले. यावेळी विशेष अधिकारी माधुरी वाघमोडे, सहाय्यक लेखाधिकारी विलास पाटील तसेच समाज कल्याण विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. तसेच 'वंदे मातरम' गीतास १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने सर्व उपस्थित मान्यवर व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सामुहिकरीत्या 'वंदे मातरम' गीताचे गायन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक सादरीकरणे केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती माधुरी वाघमोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. विलास पाटील यांनी केले.

## सोलापुरात विमानाला अडकला नायलॉन मांजा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर विमानतळाच्या सुरक्षेच्या अनुषंगाने आणखी एका गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. विमानतळ क्षेत्रात अनधिकृत प्रवेश करणाऱ्या मुलांच्या पालकांविरोधात खटला दाखल करण्यात आला आहे. विमानतळ परिसरातील वॉच टॉवर ३ जवळील सुरक्षा भिंतीवरून चार लहान मुलांना प्रवेश केला होता. या सर्व मुलांना योग्य ती समज देऊन सोडण्यात आलंय, तर पालकांवर खटले दाखल करण्यात आले आहेत. विमानतळ परिसरात नायलॉन मांजा विक्री केल्या प्रकरणी आज आणखी एका दुकानदारावर गुन्हा नोंद झाला आहे. रजाक मियाँसाब शेख या दुकानदाराविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून काल मुंबई सोलापूर विमान सोलापूर विमानतळ येथे लँड होतं असताना विमानाच्या पंखाना मांजा अडकला होता. त्यानंतर काल पोलिसांनी दोन पालकांवर खटले आणि एका दुकानदावर गुन्हा नोंदवला होता, आज पुन्हा एकदा तसाच प्रकार घडल्याने पोलिसांनी ही कारवाई केली. दरम्यान, विमानतळच्या भागात उद्घोषणा सुरु आहे की विमानतळ परिसरात पतंग उडवू नये. सोलापूर विमानतळ रेग्यूलर सुरु आहे. विमानसेवेसाठी अशा पद्धतीने पतंग उडवणे हे धोकदायक असल्याचे पोलीस अधिकारी विजय कबाडे यांनी म्हटलं आहे.

**दुचाकीस्वार शेतकऱ्याचा मृत्यू**

वर्धा जिल्ह्याच्या देवळी तालुक्यातील भिडी येथील एका दुचाकी चालकाचा पतंगीच्या नायलॉन मांजामुळे गळ्याला फास लागून मृत्यू झाला असल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सायंकाळी सहाच्या सुमारास भिडी येथील रस्त्यावर घडलेल्या या दुर्घटनेत एका निष्पाप शेतकऱ्याला आपला जीव गमवावा लागल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, दुसरीकडे सोलापूर विमानतळ परिसरातही नॉयलॉन मांजामुळे विमान वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचं समोर आले असून पोलिसांनी कारवाई करत विक्रेता आणि पतंग उडवणाऱ्या मुलांच्या पालकांवर गुन्हा दाखल केला आहे. भिडी येथील सुभाष शेलोटे हे पन्नास वर्षीय शेतकरी आपल्या शेतातील फवारणीचे आपले काम आटोपून दुचाकीने घराकडे जात असताना अचानक रस्त्यावर गळ्याला पतंगीचा मांजा आवळला गेला. पतंगीचा हा मांजा अतिशय घातक आणि धारदार असल्याने त्यांचा गळा चिरला व गळ्याला घट्ट फासही बसला गेला. त्यामुळे, या दुर्दैवी अपघातात सुभाष शेलोटे यांचा मृत्यू झाला. नायलॉन मांजाच्या धाग्याने बळी घेतला असून सुभाष हे दुचाकीवरुनच गाडीवर पडले, त्यानंतरच जागेवरच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. भिडीतील या दुर्दैवी घटनेनं पुन्हा एकदा नायलॉन मांजाचा प्रकोप समोर आला असून मांजाला बंदी असताना हा नॉयलॉन मांजा येतो कुठून? असाच प्रश्न उपस्थित होत आहे.

## उपनगरीय रेल्वे प्रवासी एकता संस्थाचे (महासंघ ) मुख्यमंत्र्यांना साकडे

# मध्य रेल्वेची मुंब्रा लोकल अपघात चौकशी निवृत्त न्यायाधीश समिती मार्फत करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रफुल्ल शेवाळे

मध्य रेल्वे वरील मुंब्रा स्थानकांदरम्यान जून २०२५ मध्ये झालेल्या उपनगरीय रेल्वे अपघात दुर्घटनेत पाच प्रवाशांचा मृत्यू आणि ९ प्रवासी जखमी झाले होते. यासंदर्भातील अपघात चौकशी ही निवृत्त न्यायाधीश समिती मार्फत करण्यात यावी अशा प्रकारचं साकडं उपनगरीय रेल्वे प्रवासी एकता संस्था अर्थात रेल्वे महासंघ च्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घातलं आहे. सदर घटने संदर्भात चर्चा करण्यासाठी रेल्वे महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री महोदय यांना पत्र लिहलं आहे आणि भेटीची वेळ मागितली आहे. रेल्वे महासंघाने याच बरोबर रेल्वे प्रवाशांना दैनंदिन भेडसावणाऱ्या प्रश्नांचा पाढा देखील वाचला आहे.

मुख्यमंत्री महोदयांना पत्र लिहताना खालील बाबी सविस्तर पणे मांडल्या आहेत.

मध्य रेल्वे च्या मुंब्रा स्थानक दुर्घटनेबाबत ठाणे रेल्वे पोलीसांनी व्हिजेटीआय या संस्थेकडून प्राप्त अहवाल आणि तपासाअंती रेल्वे पोलिसांनी रेल्वे प्रशासनातील दोन वरिष्ठ अभियंता विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे असे समजले आहे. घटनेची ऋखठ नोंद सुद्धा झालेली आहे.

तसेच रेल्वे प्रशासनाने तयार केलेल्या अहवालात सदर अपघात हा अधिकार्यांच्या हलगर्जीपणामुळे झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे असे वृत्तपत्रात दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी आलेल्या बातमीमध्ये नमूद केलेले आहे.

सदर दुर्दैवी अपघात होण्यापूर्वीच रेल्वे प्रशासनाला रेल्वे प्रवासी संघटनांकडून मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या तीव्र वळणावर अपघात होण्याची शक्यता कळविण्यात आली होती. तथापि रेल्वे प्रशासनाने याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले असे या अपघातामुळे सिध्द झालेले आहे. यामुळे या अपघातापेक्षा मोठा अपघात होऊन हजारोंच्या संख्येने बळी जाण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

या कारणास्तव सदर अपघाताची सविस्तर चौकशी ही मा. निवृत्त न्यायाधीश समिती मार्फत करण्यात यावी व प्रवाशांच्या मृत्यूला कारणीभूत ठरणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच रेल्वे प्रशासनाकडून या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या प्रवाशांच्या वारसांना नोकरी व जखमी झालेल्या प्रवाशांना योग्य ती आर्थिक भरपाई



द्यावी अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात येत आहे.

तसेच मुबंई शहर व उपनगरातील मध्य रेल्वेच्या नोकरदार प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जाऊन अक्षरशः जीवावर उदार होऊन रोजचा प्रवास करावा लागत आहे.... याकरीता

उपनगरीय रेल्वे प्रवाशांच्या मुख्य मागण्या व सूचना पुढीलप्रमाणे असून आपण वैयक्तिक लक्ष देऊन संबंधित प्रशासनाला योग्य त्या सूचना द्याव्यात व उपनगरीय रेल्वे प्रवासी महासंघ सोबत बैठक आयोजित करावी ही कळकळीची विनंती.

१)लोकल फेऱ्या वाढविण्या बाबत मुंबई महानगर प्रदेशातील लोकसंख्या वाढीमुळे दैनिक लोकल प्रवासी संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र त्यातुलनेत मागील दहा वर्षाहून अधिक काळात आवश्यकतेनुसार लोकल फेरी वाढलेली नाही. परिणामी वाढत्या लोकल गर्दीमुळे ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली ते कळवा स्टेशन दरम्यान लोकल प्रवाशांचे सर्वाधिक अपघाती बळी जात आहेत. मागील पाच वर्षांत डोंबिवली मधील अनेक तरुण प्रवाशांचे बळी गेले आहेत. यासाठी पिक आवर मधे ठाणे स्थानकातून कसारा व कर्जत बदलापूर अंबरनाथ करीता शटल लोकल फेऱ्या वाढविण्यात यावेत..

२) चठतउ मार्फत राबविले जाणारे सर्व चणढझ चे अर्थात मुंबई नागरी वाहतुक प्रकल्प हे केंद्र आणि महाराष्ट्र सरकारच्या संयुक्त आर्थिक भागीदारीत पूर्ण केले जात आहेत. त्यामुळे यापैकी कोणते प्रकल्प मुदतीत आणि प्राधान्याने पूर्ण करावेत हे ठरविण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य शासनाकडे द्यावा.. व मुबंई शहर व उपनगराकरीता स्वतंत्र झोन मंजूर करावा... जेणेकरून भारत देशाच्या आर्थिक राजधानीतील जीवनवाहिनीतून प्रवास करणाऱ्या ९०/९५ लाख प्रवाशांच्या सोयी सुविधांची निर्णय प्रक्रिया विनाविलंब आमलात आणणे सोयीस्कर होईल.

३) ठाणे स्टेशनवरील प्रचंड गर्दीचे विभाजन करण्यासाठी विद्यमान रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी सन २०१४ मध्ये मंजूर केलेले कळवा ऐरोली उन्नत रेल्वे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करावा.

४) कल्याण रिमाँडेलिंग प्रोजेक्ट हा काल मर्यादित वेळेत पुर्ण होऊन उपनगरीय रेल्वे सेवा जास्तीत जास्त कार्यक्षम होण्यासाठी प्रयत्न करावे.

५) कल्याण - बदलापूर व कल्याण - कसारा मार्गावरील नवीन ३ री व ४थी लाईनचे काम जलदगतीने पुर्ण करणे.

६) सिएसएमटी ते बदलापूर व आसनगांव करीता १५ डबा ट्रेन लवकरात लवकर सुरू होऊन वाढलेल्या गर्दीला दिलासा द्यावा.

७) पनवेल - दिवा-वसई मार्गावरील रेल्वेला उपनगरीय रेल्वेचा दर्जा देणे... व सद्यस्थितीत सुरू असलेल्या ट्रेनची संख्या वाढविणे.

८) मुबंई शहर व उपनगरातील रेल्वे करीता स्वतंत्र हेल्प लाईन नबंर कार्यान्वित करावे व सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या हेल्पलाईन नबंर मिळण्यास होणाऱ्या विलंबा मधील त्रुटी दूर करणे.

उपरोक्त मागणीबाबत आपणाकडून गांभीर्याने लक्ष देण्यात येऊन याची पुर्तता लवकरात लवकर होऊन ... मुबंई शहर व उपनगरातील प्रवाशांना सुखद व सुरक्षित प्रवास मिळावा ही नम्र विनंती.

सदर पत्राची माहिती रेल्वे महासंघा च्या अध्यक्षा सौ. लता अरगडे आणि सरचिटणीस जितेंद्र विशे यांनी दिलेली आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना सौ. लता अरगडे म्हणाल्या की रेल्वे बजेट बद्दल नेहमीच आमच्या पदरात निराशा येते, नेहमीच आम्हा रेल्वे प्रवाशांना वाटण्याच्या अक्षता दाखवल्या जातात... असं असून देखील आमचा रेल्वे प्रवासी संयमी आहे. पण भविष्यात कधी ना कधी रेल्वे प्रवाशांच्या संयमाचा बांध तुटेल आणि त्याचं रूपांतर एखाद्या मोठया आंदोलना मध्ये होईल अशी शक्यता नाकारता येणार नाही, आणि याला संपूर्ण पणे सरकारच जबाबदार असेल.

खरोखर मुंबई रेल्वे प्रश्नांवर सरकार मधील स्थानिक लोक प्रतिनिधी मग ते आमदार, खासदार, मंत्री असतील, हे सगळेच जण रेल्वे प्रवाशांच्या प्रश्नांवर शक्य तितके गंभीर होताना कधीच दिसून येत नाही. मुंबई पुढील ठाणे ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी रेल्वे प्रश्नांवर अक्षरशः चुप्पी साधत फक्त वेळकाढू पणा करतातं..प्रॅक्टिल कारवाई शून्य.....अशी कडक टिका महासंघाचे सरचिटणीस जितेंद्र विशे यांनी केली आहे.

रेल्वे च्या प्रश्नांना सरकार कडून खरोखर कुणी वाली शिल्लक आहे कां? आणि वाली शिल्लक असेल तर त्या प्रमाणे केंद्र शासन असेल की महाराष्ट्र शासन असेल, आपली ठोस भूमिका, ठोस उपाय योजना करताना कां दिसत नाही असा सवाल कल्याण कसारा रेल्वे संघटनेचे सल्लागार शैलेश राऊत यांनी उपस्थित केला आहे.

उपरोक्त रेल्वे प्रश्नांवर राज्याचे मुख्यमंत्री काय भूमिका घेतील, रेल्वे संघटनेला भेटीसाठी वेळ देतील कां? आणि यातूनच पदरात काय पडेल हे लवकरच समजेल.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते हत्तुर गावात विविध विकास कामांचे भूमिपूजन

## ग्रामदैवत श्री सोमेश्वर व श्री बनसिद्धेश्वर मंदिर विकासासाठी श३ कोटी ७५ लाखाचा निधी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत हत्तुर गाव, तालुका दक्षिण सोलापूर येथे ग्रामदैवत श्री सोमेश्वर व बनसिद्धेश्वर मंदिराच्या विकास आराखड्याच्या कामाचे भूमिपूजन राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते संपन्न झाले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर गावात ब वर्ग देवस्थान श्री सोमेश्वर व बनसिद्धेश्वर या ग्रामदैवताच्या विकासासाठी ३ कोटी ७५ लाख रुपये निधीच्या विकास कामाचे भूमिपूजन पालकमंत्री





जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गावातील इतर विकास कामांसाठी ६० लाख रुपये निधीची कामाचे भूमिपुजन करण्यात आले, ज्यामुळे एकूण ४ कोटी ३५ लाख रुपये निधीच्या कामांचे भूमिपूजन झाले.

यावेळी आमदार सुभाष देशमुख, प्रांत अधिकारी सुमित शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, सहाय्यक गटविकास अधिकारी बाळासाहेब पाटील, सरपंच सौ. ज्योतीताई कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी बोलताना प्रत्येक गावातील जनता आपल्या ग्रामदैवतावर श्रद्धा ठेवते यावर भाष्य केले. त्यांनी हत्तूर गावाच्या पुल व रस्त्यासाठी १ कोटी ९० लाख रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहिती दिली. तसेच, अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीबद्दल तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांना दिले. यावेळी त्यांनी माननीय मुख्यमंत्री यांचे आभार मानले की त्यांनी शेतकऱ्यांसाठी ३१,५०० कोटी रुपये निधी दिला आणि पावसामुळे व पुरामुळे खरडून गेलेल्या शेत जमिनीला ४७,००० रुपये हेक्टरी मदतीचा निर्णय घेतला.

आमदार सुभाष देशमुख यांनी ग्रामदैवत श्री सोमेश्वर व बनसिद्धेश्वर यांच्या विकासाबरोबरच गावातील इतर विकास कामांबद्दल बोलताना पालकमंत्री यांचे आभार मानले. त्यांनी गावचा शैक्षणिक व आर्थिक स्तर वाढवण्यासाठी विशेष लक्ष तसेच पर्यटनाच्या दृष्टीने ही गावाचा सर्वांगीण विकास साठी व कुडलसंगम या तिर्थ क्षेत्राच्या कामाला देण्याबाबत प्रयत्न करण्याची मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमाच्या शेवटी वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सामूहिक वंदे मातरम गीताचे गायन करण्यात आले.

# प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर चौथ्या दिवशी उपोषण सोडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधि/अमर जाधव

औसा शहरांमध्ये दलित - मुस्लिम वस्त्यांमध्ये विकास कामांच्या नावाखाली बोगस कामाला सुरूवात झाली भिम आर्मी चे तालूका अध्यक्ष सिध्दार्थ कांबळे यांच्या ही गोष्ट लक्षात येताच सुरू असलेल्या कामावर आक्षेप घेत काम थांबवून प्रशासनाला जाब विचारला अधिकाऱ्यांनी काम बंद करण्याचे आदेश दिल्या नंतर सुध्दा इंजिनिअर गुत्तेदार यांनी मनमानी पद्धतीने बोगस काम पुर्ण केले बोगस काम करून स्व:ताचे खिसे भरणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात भिम आर्मीचे जिल्हा अध्यक्ष विलास चक्रे यांच्या आदेशानुसार तालूका अध्यक्ष सिध्दार्थ कांबळे यांच्या नेतृत्वाखाली तालुका संघटक सुनिल जोगदंड



यांनी नगर परिषद समोर उपोषणाला सुरुवात केली चौथ्या दिवशी लेखी आश्वासनानंतर नगर परिषद चे मुख्य अधिकारी व औसाचे पोलीस निरीक्षक यांच्या हस्ते ज्युस पिऊन या उपोषणाला स्थगिती दिली.

स्थगिती दिल्यानंतर सुध्दा अधिकाऱ्यांना सुचना दिल्या आहेत दिलेल्या वेळेत जर त्यांनी दिलेले आश्वासन ठराविक दिवसांत पुर्ण करत अधिकाऱ्यांवर कारवाई नाही केली तर मोठ्या ताकदीने हे आंदोलन औसा शहरांमध्ये उभं राहील नगर परिषद मुख्य अधिकारी यांच्या सोबत चर्चा करताना भिम आर्मी चे मराठवाडा निरीक्षक अक्षय धावारे माजी मराठवाडा अध्यक्ष विनोद कोल्हे जिल्हा अध्यक्ष विलास चक्रे जिल्हा उपाध्यक्ष विशाल पोटभरे जिल्हा कार्याध्यक्ष बबलू तालुका अध्यक्ष सिध्दार्थ कांबळे आदित्य कांबळे लातूर तालुका अध्यक्ष बप्पा घनगावकर आजाद समाज पार्टी चे महाराष्ट्र उपाध्यक्ष सत्यजित साळवे मराठवाडा अध्यक्ष बलराज दाभाडे महाराष्ट्र सचिव किशोर मस्के आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# शिवदास रिंढे यांच्या आक्रमक भूमिकेमुळे शेतकऱ्यांचा मार्ग मोकळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने अतिवृष्टी झालेल्या पिकांची नुकसान भरपाई म्हणून प्रत्येक शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा केले आहेत . पण अनेक शेतकऱ्यांच्या खात्याला बँकेचे होल्ड लावलेले असल्याने पैसे काढण्यासाठी अडचण निर्माण झाली आहे . आज कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस शिवदास रिंढे यांनी शेतकऱ्यांच्या खात्याचे होल्ड काढण्यासाठी शेतकऱ्यांना अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले असता शाखा अधिकारी सचिन खेडकर यांनी सर्व शेतकऱ्यांचे होल्ड काढून त्यांना मदत वाटप करण्याचे आदेश संबंधित कर्मचाऱ्यांना दिले .

भारतीय स्टेट बँक शाखा साखरखेर्डा अंतर्गत ५ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांची खाती आहेत . महाराष्ट्र शासनाने अतिवृष्टी झालेल्या पिकांची नुकसान भरपाई म्हणून शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यास सुरुवात केली आहे . त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे . खरीप हंगाम संपला असून रब्बी हंगामात गहू , हरभरा , मका , भुईमूग, करडी ही

**शासकीय मदत शेतकऱ्यांना तत्काळ मिळणार, सर्वांचे बँक होल्ड काढणार : शाखा अधिकारी सचिन खेडकर**

पिके घेण्यासाठी तत्पर झाला आहे . परंतु अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे . खरीप हंगाम पाण्यात गेल्याने हाती काहीच लागले नाही . पेरणीचा खर्चही निघाला नाही . शेतकऱ्यांची दिवाळी यावर्षी अंधारात गेली . रब्बी हंगामात



पेरणीसाठी पैसा नसल्याने शासनाने दिलेल्या मदतीतून पेरणी करावी असा निर्णय शेतकऱ्यांनी घेतला होता . भारतीय स्टेट बँकेत जमा झालेले पैसे काढण्यासाठी शेतकरी गेला असता बँक खात्याला होल्ड लावलेले असल्याने पैसे निघत नाही . यामुळे शेतकरी वैतागले होते . शेतकऱ्यांची अडचण पाहता जिल्हा कॉंग्रेसचे सरचिटणीस शिवदास रिंढे यांनी ७ नोव्हेंबर रोजी सर्व शेतकऱ्यांना आवाहन करीत ज्यांच्या खात्याला होल्ड लावलेले आहेत त्यांनी बँकेसमोर भेटण्याचे आवाहन केले होते . आज शेकडो शेतकऱ्यांचे कर्ज जमा करून भारतीय स्टेट बँकचे शाखा अधिकारी सचिन खेडकर यांच्या सुपुर्द केले . त्यावेळी खेडकर यांनी सर्व शेतकऱ्यांचे होल्ड काढण्यासाठी शेतकऱ्यांनी सात बारा आणि इतर कागदपत्रे झेरॉक्स प्रत काढून जमा करावे . त्यांचे होल्ड काढून त्यांना मदतीची रक्कम तत्काळ देण्यात येईल . मीही शेतकऱ्यांचा पुत्र आहे . त्यामुळे मी शेतकऱ्यांच्या अडचणी समजू शकतो . शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही , याची दक्षता मी घेतो . यावेळी शिवदास रिंढे यांच्या जवळील सर्व अर्ज स्विकारुन होल्ड काढण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांना दिले . शाखा अधिकारी सचिन खेडकर यांनी दाखविलेल्या तत्परते बद्दल शेतकऱ्यांनी आभार मानले . यावेळी सचिन खंडारे , पत्रकार अशोक इंगळे यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# पखालपूर गणपतीसाठी एसटी बस धावणार: ग्राहक पंचायत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या मागणीप्रमाणे संकष्टी चतुर्थी दिवशी, श्री क्षेत्र पखालपूर जाणाऱ्या पंढरपूर एसटी आग्रहातून सकाळी सात पासून एसटी बसची सोय करण्यात आल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

शनिवार दिनांक ८ /११/ २०२५ रोजी संकष्टी चतुर्थी दिवशी प्रवाशांच्या सोयीसाठी पंढरपूर आग्रहाने एसटी बसची




सेवा करून दिली आहे. तरी प्रवासी बांधवांनी भाविकांनी एसटी बसचा प्रवास करून श्री क्षेत्र पकालपूर येथील श्री गणेशाचे दर्शन घ्यावे असे आव्हान आहार प्रमुख योगेश लिंगायत, स्थान प्रमुख अंकुश सलगर, अखिल भारतीय ग्राहक पंचायती प्रांत सहसचिव दीपक इरकल सदस्य विनोद भारदे सुभाष सरदेशमुख जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास, जिल्हा सचिव सुहास निकते, उपाध्यक्ष विनय उपाध्ये पांडुरंग हल्लापूरकर तालुका उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे महेश भोसले सदस्य सागर शिंदे अंकुश वाघमारे संभाजी लंगोटे आझाद अल्लापूरकर प्रशांत मळवदे सचिव निपाणीकर यांनी केले आहे जुने एसटी स्टँड येथून सुटतील याची प्रवाशांनी नोंद घ्यावी.

# वंदे मातरम गीताचे निफाड तालुकास्तरीय सामूहिक गायन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

वंदे मातरम या गीताच्या लिखाणाला १५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल, कवी कुसुमाग्रज औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयाच्या वतीने निफाड येथील वैनतेय विद्यालयात वंदे मातरम गीताचे तालुकास्तरीय सामूहिक गायन संपन्न झाले.

याप्रसंगी व्यासपीठावर निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे, गटशिक्षणाधिकारी विलास साळी, प्रमुख व्याख्याते विवेकानंद चटपल्लीवार, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी कविता पाटील , एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी आरती गांगुर्डे,निफाडच्या दुय्यम निबंधक दिपाली जगताप, न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि. दा.व्यवहारे ,संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले, ड दिलीप वाघावकर ,राजेश सोनी मधुकर राऊत ,विश्वास कराड,कवी कुसुमाग्रज औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयाच्या प्राचार्या सुनीता शिंदे , , वैनतेय विद्यालयाच्या प्राचार्या मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक बी. बी गुंजाळ पर्यवेक्षिका आर. एम. लाहोटी आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक कवी कुसुमाग्रज औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या सुनीता शिंदे यांनी केले त्यानंतर



कवी कुसुमाग्रज औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच तालुक्यातील आयटीआय कॉलेजच्या विद्यार्थी वैनतेय विद्यालयाच्या व इतर शाळांतील विद्यार्थ्यांनी सामूहिक वंदे मातरम गीताचे गायन केले कवी कुसुमाग्रज औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी वंदे मातरम नाटिका सादर केली आहे याप्रसंगी प्रमुख व्याख्याते प्रा.विवेकानंद चटपल्लीवार यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की वंदे मातरम या गीताने देशातील सर्वदूर राहणाऱ्या नागरिकांना एकत्रितपणे गुंफण्याचे काम केले या गीतामुळे या देशाचे भविष्य सांभाळणाऱ्या नवीन पिढीला सामर्थ्य मिळेल असे ते म्हणाले.

याप्रसंगी तहसीलदार विशाल नाईकवाडे, प्रा.विवेकानंद चटपल्लीवार यांची भाषणे झाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश महाले यांनी केले याप्रसंगी विविध शाळातील विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते.

**श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या पहिल्या ५ साखर पोत्यांचे आमदार प्रविण दरेकरांच्या हस्ते पूजन**

# आमदार अभिजीत पाटील यांना मुख्यमंत्र्यांचा आशीर्वाद : आमदार प्रविण दरेकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ सुरू असलेल्या गळीत हंगामातील पहिल्या ५ साखर पोत्यांचे पूजन भाजपा गटनेते व महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आ. प्रविण दरेकर त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सायली प्रविण दरेकर, डॉ. यश प्रविण दरेकर त्यांच्या कुटुंबियांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माढा विधानसभा मतदार संघाचे आमदार व श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील, संचालक मंडळ, कारखान्याचे सभासद, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. दरेकर म्हणाले कि, विठ्ठल सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचे वैभव आहे. मध्यंतरीच्या काळी कारखान्याला घरघर लागली होती. आ. अभिजीत पाटील यांनी कारखान्याच्या व सभासदांच्या रक्षणासाठी उडी घेतली. त्यांच्या नेतृत्वावर तुम्ही सर्वांनी विश्वास ठेवला व कारखान्याचे नेतृत्व त्यांच्याकडे दिलात. कारखानदारीशी संबंध नसतानाही केवळ तुमच्याविषयी प्रामाणिक संवेदना होती म्हणून हा कारखाना आज प्रगतीकडे जाताना दिसत असल्याचे दरेकर म्हणाले.

दरेकर पुढे म्हणाले कि, मुंबई जिल्हा बँकेचे मुंबई हे कार्यक्षेत्र आहे. परंतु ग्रामीण भागातील कारखाने अडचणीत आले तर त्या कारखान्यांना ताकद देण्याचे, उर्जितावस्थेत आणण्यासाठी मदत आम्ही करतो. पण धाडसाने कारखाना अडचणीतून



बाहेर काढण्याचे काम आ. अभिजीत पाटील यांनी केले. म्हणून मुंबई बँक त्यांच्या मागे ताकदीने उभी आहे. अभिजीत पाटील यांना विठ्ठल एवढा पावला कि विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष होत असताना विधिमंडळाच्या सभागृहात येण्याची संधी तुम्ही त्यांना दिली. कारखानदारी ही ग्रामीण भागातील आर्थिक उलाढाल करणारी मुख्य संस्था आहे. आज सहकारी साखर कारखाने खासगी झाले व सहकारी कारखाने अडचणीत यायला लागले. सहकारी तत्वावर लोकांचा कारखाना असतो तो लोकांसाठी असतो. म्हणून अभिजीत पाटील यांनी सहकारी साखर कारखान्यावर प्रेम केले व लोकांसाठी ते काम करत असल्याचेही दरेकर म्हणाले.

आ.अभिजीत पाटील यांना मुख्यमंत्र्यांचा आशीर्वाद

दरेकर म्हणाले कि, आ. अभिजीत पाटील यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आशीर्वाद दिलाय. ते कुठल्या पक्षाचे आहेत त्यापेक्षा शेतकऱ्याला ताकद देत असून असा होतकरू तरुण ताकदीने मैदानात उभा आहे तर त्याला ताकद दिली पाहिजे या भावनेतून आम्ही सर्वजण विठ्ठल कारखान्याच्या सभासद आणि संचालक मंडळासोबत आहोत. जो लोकांच्या भल्याची चिंता करतो, जो आपल्या राज्याच्या विकासासाठी हातभार लावणारा प्रकल्प हिमतीने यशस्वी करत असेल तर त्याला ताकद देणे, त्याच्या पाठीशी उभे राहणे हे आमचे कर्तव्य आहे. भविष्यातही पाटील शेतकऱ्यांसाठी जे प्रकल्प हाती घेतील त्यासाठी मी आणि मुख्यमंत्री त्यांच्या मागे असेच उभे राहू, असा विश्वासही दरेकरांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यकारी संचालक श्री डी. आर. गायकवाड यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

सदर प्रसंगी कारखान्याचे संचालक संभाजी भोसले, कालिदास पाटील, दिनकर चव्हाण, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, सचिन वाघाटे, जनक भोसले, प्रविण कोळेकर, नवनाथ नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे, सिताराम गवळी, अशोक जाधव, सिध्देश्वर बंडगर, महेश खटके, विठ्ठल रणदिवे, दशरथ जाधव, अशोक तोंडले, अंगद चिखलकर, अशोक घाडगे, तानाजी बागल, समाधान गाजरे, धनाजी खरात, उमेश मोरे, गणेश ननवरे, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते, सभासद व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पडघा बालाजी नगरातील बोगस भूमिगत गटार कामाचा भंडाफोड!

## जिल्हा परिषद बांधकाम विभागाची दखल – ठेकेदारावर कारवाईचे आदेश; ग्रामपंचायत प्रशासनास उपविभागीय अभियंत्यांचा लेखी इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघा बालाजी नगर परिसरात गेल्या काही महिन्यांपासून करण्यात आलेल्या भूमिगत गटार योजनेच्या कामात मोठ्या गैरव्यवहाराचा भंडाफोड झाला आहे.स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनंतर अखेर जिल्हा परिषद बांधकाम विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून बोगस काम असल्याचे निष्पन्न केले आहे.यानंतर उपविभागीय अभियंत्यांनी ग्रामपंचायत प्रशासनाला ठेकेदारावर कारवाई करण्याचे आदेश दिल्याने ग्रामपंचायतीचा कारभार पुन्हा एकदा चौकटीत आला आहे. बालाजी नगरमधील भूमिगत गटार योजनेसाठी सुमारे २६ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता.मात्र,प्रत्यक्षात गटार नळीचा उतार चुकीचा,सिमेंटची गुणवत्ता निकृष्ट,तर काही ठिकाणी काम अपूर्णच ठेवण्यात आलेले दिसून आले.नागरिकांच्या तक्रारीनुसार गटारातील पाणी वाहत न जाता रस्त्यावर ओसंडून वाहू लागले.परिणामी दुर्गंधी,डास आणि रोगराईचा त्रास वाढला. ग्राम पंचायतने आम्हाला स्वच्छतेचं स्वप्न दाखवलं,पण प्रत्यक्षात आम्हाला मिळाली ती दुर्गंधी आणि बोगस कामाची शिक्षा! असे संतप्त नागरिकांनी सांगितले.

### उपविभागीय अभियंत्यांचा आदेश


उपविभागीय अभियंता यांनी ग्रामपंचायतीला लेखी आदेश देत नमूद केले आहे की, सदर ठेकेदारास तातडीने काम दुरुस्तीचे आदेश द्यावेत.जर दुरुस्ती योग्यरित्या झाली नाही तर संबंधित ठेकेदाराचा हप्ता थांबवावा आणि भविष्यातील कंत्राटांमधून काळ्या यादीत टाकण्यात यावे. त्याचबरोबर ग्रामपंचायतीने केलेल्या सर्व भूमिगत गटार कामांची तपासणी अहवाल १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. पडघा बालाजी नगरातील भूमिगत गटार योजनेचे बोगस काम हे केवळ तांत्रिक नाही,तर गावस्तरावर चालणाऱ्या भ्रष्टाचाराचे प्रत्यक्ष उदाहरण ठरत आहे.जिल्हा परिषद बांधकाम विभागाने केलेली कारवाई ही पहिली पायरी असली तरी पुढील पावले निर्णायक ठरणार आहेत.

जिल्हा परिषद बांधकाम विभागाची पाहणी

नागरिकांनी दिलेल्या तक्रारीवरून ठाणे जिल्हा परिषद बांधकाम विभागाने चौकशी समिती गठित केली.या समितीने नुकतीच पडघा बालाजी नगर येथे प्रत्यक्ष पाहणी केली.अहवालात स्पष्ट नमूद करण्यात आले की,-- गटार योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे असून,ठेकेदाराने तांत्रिक अटींचे उल्लंघन केले आहे.संबंधित ठेकेदार व ग्रामपंचायत जबाबदार आहेत.

या निष्कर्षानंतर उपविभागीय अभियंता यांनी ठेकेदारावर तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत. तसेच ग्रामपंचायत प्रशासनास अशा प्रकारची कामे भविष्यात सहन केली जाणार नाहीत॰ असा इशाराही दिला आहे.



ठेकेदाराचा बचाव - काम योग्यरीत्या केलं

संबंधित ठेकेदाराने मात्र स्वतः वरच्या आरोपांना फेटाळून लावत काम नियमानुसार केलं असून,काही ठिकाणी स्थानिक अडचणींमुळे पाणी साचले असावेअसा बचाव केला आहे.परंतु अभियंत्यांच्या अहवालानुसार किमान ७ ठिकाणी गटार लाईन तुटलेली,वाकलेली किंवा गाळाने बंद झालेली असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या संपूर्ण प्रकरणात काही ग्रामपंचायत सदस्य आणि माजी पदाधिकाऱ्यांचा ठेकेदाराशी संबंध असल्याची चर्चा गावात जोरात आहे.कंत्राट मंजूर करताना गुणवत्ता पाहिली का?आणि निधीच्या बदल्यात कोणाला किती फायदा झाला? या प्रश्नांवर ग्रामस्थ चर्चा करत आहेत.काही नागरिकांनी लोकायुक्त आणि ग्रामीण विकास विभागाकडेही तक्रार दाखल करण्याची तयारी दर्शवली आहे.

# मेरा बुद्रुक कोलारा सर्कल मधून उच्चशिक्षित मिना सुनिल अंभोरे जिल्हा परिषद निवडणुक लढविणार !

दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क
राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक,कोलारा सर्कल मधून पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते सुनिल अंभोरे यांच्या पत्नी सौ.मिना सुनिल अंभोरे या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक लढवण्याच्या चर्चेला जोरदार उधाण आले असून.सौ.मीनाताई सुनिल अंभोरे यांचे पती अनेक वर्षांपासून विविध संघटनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत.तसेच अभिनयाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोचलेले आहेत.ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती या संघटनेच्या माध्यमातून विविध पदावर कार्यरत असून अनेक ग्राहकांच्या तक्रारी व ग्राहक जनजागृती त्यांनी जिल्ह्यामध्ये केलेली आहे. त्या माध्यमातून तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून आपल्या लेखणीतून त्यांनी शेतकरी,कष्टकरी लोकांच्या व्यथा त्यांनी मांडलेल्या आहेत.सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृतीच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून जनतेपर्यंत ते पोहोचलेले आहेत.राष्ट्रीय,राज्यस्तरीय तसेच विविध पुरस्काराने ते सन्मानित आहेत.सर्कल नव्हे तर संपूर्ण परिसरामध्ये त्यांच्या नावाचा परिचय असून त्यांच्या पत्नी सौ.मिना सुनिल अंभोरे या उच्चशिक्षित असून कोरोना काळामध्ये त्यांनी चांगल्या प्रकारे कार्य केल्याने त्यांना सन्मानित सुद्धा करण्यात आले आहे. उत्कृष्ट निवेदक,उत्कृष्ट वकृत्व ,बचत



गटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण व संघटन त्यांनी मजबूत केले आहे. जिल्ह्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे पडघम वाजताच मेरा बुद्रुक कोलारा सर्कलमधुन अनेकांचे नावे सध्या चर्चेत असून सौ.मीनाताई सुनिल अंभोरे या उच्चशिक्षित असल्यामुळे अनेक मतदारांनी त्यांच्यावर विश्वास टाकत असल्याचे सध्यातरी चित्र दिसत आहे. जिल्हा परिषद पंचायत समिती या निवडणुका नुसत्या पैशावर होत नसून,त्यांचे सामाजिक कार्य,त्यांच्यासमोर समाजाप्रती असलेले समर्पण,त्यांचा असलेला जनसंपर्क, यांचा असलेला प्रशासनातील अनुभव, अभ्यास, जनते प्रती असलेली अस्मिता, अशा विविध घटकावर उमेदवारांची किंवा कार्यकर्त्यांची प्रतिमा अवलंबून असते. अशातच राजकीय नेते नुसते आर्थिक बाबीवर भर देऊन तो कसा सक्षम आहे, हे जनतेसमोर बांधकाम दिसत आहे. परंतु जनता बोलत नसती ती निरीक्षण करत असती. त्यांच्या मनात असलेल्या योग्य उमेदवार ते निवडून देत असती. संपूर्ण प्रक्रिया मध्ये जनता ही आपली भूमिका योग्य रीतीने बजावत असताना समाजासाठी योग्य की, अयोग्य अशा प्रकारच्या उमेदवाराची निवड करत असते आणि अशा प्रकारचे निवडून आलेल्या सदस्यावर समाजाची सुद्धा फार मोठी जबाबदारी असती. त्यांनी प्रामाणिकपणे जनसेवा केली पाहिजे तरच लोकशाही बळकट होईल आणि त्यामधून देशाचा विकास होईल. आज आपण पाहत आहोत देश अधोगतिकडे जात आहे. परंतु लोकशाहीत असेही काही घटक आहेत जे देशाच्या हितासाठी योग्य रीतीने, सदविवेक बुद्धीने योग्य न्याय देऊन लोकशाहीचा पाया असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये लोक पाठवत असतात. अशा उच्चशिक्षित असलेल्या सौ.मिनाताई अंभोरे यांच्यासारख्या उच्चशिक्षित महिलांना संधी दिली गेली पाहिजे. त्यांच्या या सामाजिक कार्यांचा त्यांना नक्कीच फायदा होईल. यांना कुठल्याही प्रकारचा राजकीय वारसा नसून सुद्धा राजकीय,सामाजिक तसेच विविध क्षेत्रांमध्ये त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे. त्यांना जर संधी मिळाली त्या नक्कीच संधीचे सोने करतील.सौ.मिना सुनिल अंभोरे या निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्यामुळे मतदारांमध्ये योग्य उमेदवार आहे या नावाची सर्कलमध्ये जोरदार चर्चा असून उच्चशिक्षित उमेदवारालाच निवडून देण्याचा मानस सध्या तरी मेरा बुद्रुक सर्कलमध्ये मतदाराकडून होत असल्याचे दिसून येत आहे.

# मनोज जारंगे पाटील यांच्या हत्येचा कट रचणाऱ्यावर कारवाई करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांना जीवे मान्यता कट रचना यावर कठोर कारवाई करण्यात यावी असे आशयाची मागणी करणारे निवेदन मंगळवेढा सकल मराठा समाजाच्या वतीने पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरी गिड्डे यांना निवेदन देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा चरंगे पाटील हे मराठा समाजाच्या अन्याय हक्कासाठी सातत्याने लढा देत असून त्यांच्या नेतृत्वामुळे राज्यभरात मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली आहे. परंतु काही असामाजिक प्रवृत्ती कडून त्यांच्या जीवितास धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याच्या बातम्या प्रसार माध्यमातून समोर येत

**सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदनावरद्वारे मागणी**




आहेत. मनोज दादा जरांगे पाटील यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत संवेदनशील स्वरूपाचा असून जनतेमध्ये या विषयी तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आपणास विनंती आहे की या प्रकरणाची सखोल चौकशी जीवे मारण्याचा कट रचणाऱ्या आरोपीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच मनोज दादा जरांगे पाटील यांच्या सुरक्षिततेची गांभीर लक्षात घेऊन आवश्यक असलेली शासकीय सुरक्षा तात्काळ पुरवण्यात यावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आले आहे त्यामुळे मंगळा तालुक्यातील सकल मराठा समाजाची बांधव उपस्थित होते.

# बाबासाहेबांचे विद्यार्थी जीवन हे संघर्षमय होते : डॉ शहाजी चंदनशिवे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/परंडा : डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्यार्थी जीवन संघर्षमय होते त्यांनी संघर्ष करूनच शिक्षण पूर्ण केले. विद्यार्थी कसा असावा तर तो डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखा असावा ज्यांनी शाळेच्या बाहेर बसून शिक्षण घेतले आज त्यांचा कोलंबिया विद्यापीठांमध्ये मोठा पुतळा उभा आहे. हे केवळ शिक्षणाने साध्य झाले. शिक्षण घेण्याची परिस्थिती बाबासाहेबांची नव्हती तरीसुद्धा बाबासाहेबांनी रात्रंदिवस दिव्याखाली बसुन अभ्यास करून



या देशाची घटना लिहिली.

विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांचा आदर्श घ्यावा त्यांचे विचार आत्मसात करावे असे मत डॉ शहाजी चंदनशिवे यांनी महाविद्यालयात आयोजित केलेल्या विद्यार्थी दिवस या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील जाधव यांच्या अध्यक्षतेखाली शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी उप प्राचार्य डॉ महेश-कुमार माने प्रशासकीय अधिकारी श्री भाऊसाहेब दिवाने प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ अतुल हुंबे डॉक्टर संतोष काळे प्राध्यापक केशव शेटे प्राध्यापक प्रकाश मिसाळ बबन ब्रह्मराक्षस जयवंत देशमुख यांच्यासह महाविद्यालयात संशोधन करणारे विद्यार्थी याप्रसंगी उपस्थित होते.

डॉ अतुल हुंबे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून प्रतिमा पूजन केले.

## शेतकऱ्यांना खते व औषधे निर्मितीत स्वावलंबी करण्याचा उद्देश

## अनुभव कथन मेळावा आणि राज्यस्तरीय 'पोशिंदा' पुरस्कार सोहळा

# स्वेरीत आत्मनिर्भर कृषीप्रधान भारत निर्मितीसाठी दोन दिवसीय तंत्रज्ञान कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'आत्मनिर्भर आणि बलशाली कृषीप्रधान भारताच्या निर्मितीसाठी तसेच शेतकऱ्यांना खते व औषधे निर्मितीत स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने 'आत्मनिर्भर शेतकरी अभियान' या उपक्रमांतर्गत गोपाळपूर (ता. पंढरपूर) मधील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये दि. २ व ३ नोव्हेंबर २०२५ रोजी दोन दिवसीय, विज्ञान संत अंकुश पाटील तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली. या निमित्ताने अनुभव कथन मेळावा आणि राज्यस्तरीय 'पोशिंदा' पुरस्कार सोहळा ही पार पडला.





या कार्यशाळेचे आयोजन विज्ञान संत अंकुश पाटील कृषी तंत्रज्ञान समिती महाराष्ट्र, जय जवान-जय किसान, वेंकटेश्वरा को-ऑप पॉवर अँड ॲग्रो प्रोसेसिंग सह. संस्था, नाशिक, मका आधारित इथेनॉल निर्मिती प्रकल्प, इंदापूर, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर आणि पोलिस किसान, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक (ग्रामीण) अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या उपक्रमात कार्यक्रमाचे उदघाटक स्वेरीचे युवा सचिव डॉ. सुरज रोंगे, प्रमुख अतिथी वेंकटेश्वरा को-ऑप पॉवर अँड ॲग्रो प्रोसेसिंग सह. संस्था, नाशिकचे चेअरमन डॉ. शिवाजीराव डोळे, कार्यशाळा प्रशिक्षक विज्ञान संत अंकुश पाटील, सेवानिवृत्त डी. वाय.एस.पी. व पोलिस किसान सह. संस्था, पंढरपूरचे संस्थापक नानासाहेब कदम, पोलिस किसान, पंढरपूरचे चेअरमन राजेंद्र पाटील, श्रीपाद डांगे, स्वेरीचे माजी अध्यक्ष तथा जेष्ठ विश्वस्त धनंजय सालविठ्ठल आदी उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने या कार्यक्रमाचे उदघाटन झाले. प्रास्ताविकात सेवानिवृत्त डी. वाय.एस.पी. व संस्थापक, पोलिस किसान सह. संस्था, पंढरपूरचे संस्थापक नानासाहेब कदम यांनी सांगितले की, 'रासायनिक खते,औषधे मुक्त- स्वयंपुर्ण आत्मनिर्भर शेतकरी बनविण्यासाठी पोलिस किसान, पंढरपूरच्या वतीने आजपर्यंत ४४ प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या असून, त्याद्वारे २५ हजार शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे.

पुढे ते म्हणाले की या तंत्रज्ञानाचा परिणाम केवळ शैक्षणिक प्रसारापुरताच मर्यादित नाही; प्रत्यक्षात आज एक लाख एकरपेक्षा अधिक जमिनीत हे तंत्रज्ञान उपयोगात आणले गेले आहे. त्यांनी उदाहरण देत सांगितले की 'काही भागात शेतकऱ्यांनी घरगुती पद्धतीने तयार केलेली खत-औषधे वापरून उत्पादनात अपेक्षित वाढ आणि शेती खर्चात झालेली लक्षणीय कपात अनेकांनी अनुभवली आहे.' कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून मनोगत व्यक्त करताना स्वेरी, पंढरपूरचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांनी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेशी हे विज्ञान संत अंकुश पाटील कृषी तंत्रज्ञान सुसंगत आहे.' असे सांगताना अल्प खर्चात शेतकर्यांनी घरच्या घरी खते व औषधे तयार करून त्यांचा वैज्ञानिक पद्धतीने उपयोग केल्यास उत्पादनात वाढ होण्याबरोबर खर्चातही लक्षणीय बचत होऊ शकते. भारत कृषिप्रधान देश होता, आहे व असणार आहे. चांगल्या पिकांचे उत्पादन घेत असताना जमिनीचा कस चांगला राखण्याचे आव्हान आजच्या शेतकऱ्यांपुढे आहे. त्यादृष्टीने शेतकऱ्यांसाठी हे तंत्रज्ञान परंपरागत रासायनिक खते किंवा बाह्य बाजारावर अवलंबित्व कमी करणार आहे व शेतकर्यांना आर्थिक स्वावलंबनाकडे नेणारे आहे. यामुळे भारत पुन्हा एकदा कृषी महासत्ता म्हणून उभा राहू शकतो.' असे नमूद केले. 'ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाद्वारे स्वेरी सातत्याने काम करत आहे. 'ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास' हेच स्वेरीचे ब्रीद असल्याने अशा उपक्रमांना स्वेरीचे संशोधन केंद्र सर्वतोपरी सहकार्य करेल' असेही सांगितले. प्रमुख अतिथी नाशिकच्या वेंकटेश्वरा को-ऑप. पावर अँड ॲग्रो प्रोसेसिंग सह. संस्थेचे (मर्यादित) चेअरमन डॉ. शिवाजीराव डोळे म्हणाले की, 'मका-आधारित इथेनॉल निर्मिती प्रकल्प, इंदापूर हा सेवानिवृत्त जवानांना आणि स्थानिक शेतकऱ्यांना प्रेरणास्त्रोत ठरत आहे. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक मा. पंतप्रधानांच्या 'मन की बात' मध्ये व केंद्रीय ग्रहमंत्री अमित शाह यांनी केले आहे. या प्रकल्पासाठी बाराशे कोटी रुपये खर्च करून इंदापूर येथे मोठ्या पातळीवर मका-आधारित इथेनॉल संयंत्र उभारले जात आहेत; यासाठी लागणारी सुमारे रु.५२० कोटींची मका खरेदी सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून थेट खरेदी केली जाणार आहे.' डॉ. डोळे यांनी सांगितले की, 'हा प्रकल्प केवळ औद्योगिक गुंतवणूक नाही, तर स्थानिक शेतकऱ्यांसाठी आर्थिक समृद्धीची आणि स्थिर बाजारपेठेची खात्री करणारा 'वरदान प्रकल्प' ठरेल. यामुळे शेतकऱ्यांना दरांचे भक्कम करार, मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होणे, तसेच पिकासाठी नवीन तांत्रिक सहाय्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. त्यांनी सोलापूर जिल्ह्याचे सर्व शेतकरी व स्थानिक हितसंबंधींना या प्रकल्पाचे सभासद बनून त्याचा थेट लाभ घेण्याचे आवाहन केले व आश्वासन दिले की प्रकल्पाचे सर्व निर्णय व लाभ स्थानिक समुदायाच्या हितासाठी पारदर्शक पद्धतीने राबवले जातील. कार्यशाळा प्रशिक्षक विज्ञान संत अंकुश पाटील (सांगली) यांनी कार्यशाळेत ऊस, सोयाबीन, मका, फळे व भाजीपाला यांसारख्या सर्व पिकांसाठी आवश्यक अमिनो ॲसिड, सिलिकॉन स्टिकर, लाईम सल्फर, ह्युमिक ॲसिड, फुल्विक ॲसिड, मायक्रो न्यूट्रिएंट्स, शेण-जिवामृत, निमकरंज तेल इत्यादी जैविक खते व औषधे घरच्या घरी तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. त्यांनी प्रत्येक घटक बनविण्याचे तंत्र, वापराचे प्रमाण व पिकनिहाय शेड्युल शेतकऱ्यांना समजावून सांगितले. ही जैविक खते व औषधे त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांकडून बनवून घेतली. या तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचा खर्च कमी होऊन त्यांना स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर होण्यास मदत होईल, असे त्यांच्या मार्गदर्शनात सांगितले. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते नवोन्मेषी शेतकऱ्यांना 'पोशिंदा' पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचे अनुभव कथनही या वेळी ऐकण्यात आले. वेंकटेश्वरा को-ऑप. पॉवर अँड ॲग्रो प्रोसिसिंग सह. संस्था मर्यादित, नाशिक, मका आधारित इथेनॉल निर्मिती प्रकल्प इंदापूरचा शेअर्स शुभारंभ सुद्धा यावेळी करण्यात आला.

या ऐतिहासिक कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन पोलिस किसान, पंढरपूरचे चेअरमन राजेंद्र पाटील, गणेश रत्नपारखी, बिरुदेव पारेकर, राजेंद्र डांगे, श्रीपाद डांगे, मांदे आणि प्रविण जाधव यांनी परिश्रमपूर्वक केले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या आत्मनिर्भरतेकडे एक महत्वपूर्ण पाऊल टाकले गेले असून, महाराष्ट्रातील कृषी विकासाला नवी दिशा मिळाली आहे, हे मात्र नक्की!